॥ ॐ ॥
# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त
ऑगस्ट २०२०

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : ९०११३८६३८६ भ्रमणध्वनी : ९८२२६७५७६०
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org

# त्या अनाम वीरांसाठी

घनघोर तिमिर असताना ते ज्योत होऊनी जळले
घेऊन वीज प्राणांची ते जुलुमावर कोसळले
घरदार सोडिले त्यांनी, तोडिले पाश मायेचे
घेतले निखारे हाती, उधळून छत्र छायेचे

त्या अनाम वीरांसाठी हा दिवा लाविते आहे
त्या स्मृतीवरी शूरांच्या ही फुले ठेविते आहे

मातेच्या मुक्तीसाठी हृदयात पेटला ध्यास
मानिली फुलांची माला तो गळ्याभोवती फास
ते फकीर देशासाठी, हातात घेतली झोळी
'जय भारतमाता' म्हणता छातीतुन शिरली गोळी

त्या मृत्युंजय रक्ताचा मी टिळा लाविते आहे
त्या अनाम वीरांसाठी हा दिवा लाविते आहे

हातात तिरंगा धरुनी ते कोसळताना वदले :
"हा आहे देश महान" अन् विझता विझता हसले
हा उत्सव स्वातंत्र्याचा हा बलिदानाचा आहे
हा विजयसोहळा सारा त्या समर्पणाचा आहे

आजच्या यशाला त्यांची मी शपथ घालिते आहे
त्या अनाम वीरांसाठी हा दिवा लाविते आहे

कवी : मंगेश पाडगावकर

# ७३ वा स्वातंत्र्यदिन विशेष



१५ ऑगस्ट ध्वजारोहणाचा कार्यक्रम शासकीय नियमांचे पालन करून निवडक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पार पडला. वर्धिनीच्या सर्व विभागातील कार्यकर्त्यांसाठी संध्याकाळी ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**विषय - चीनचे वाढते वर्चस्व आणि भारतापुढील आव्हाने**

पुढच्या काळात आपल्या देशासमोर सर्वांत मोठे आव्हान चीनचे असणार आहे. ते आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, सामरिक असे सर्वच पातळ्यांवर असणार आहे. त्याला सामोरे जाण्यासाठी भारताचे कोणकोणत्या पातळीवर प्रयत्न असावे लागतील यावरील आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक मा. डॉ. श्रीकांतजी परांजपे यांनी अतिशय अभ्यासपूर्ण मांडणी केली.

# शाखा विभाग

## व्यवस्थाश: प्रशिक्षण कार्यक्रम

'स्व' - रूपवर्धिनी शाखा विभागाची नव्या जोमाने सुरुवात होते ती जून- जुलै महिन्यात. दरवर्षी या काळात होणाऱ्या युवा शिबीरात नव्या व्यवस्था प्रमुखांच्या प्रशिक्षणाने आपल्या कामाचा श्रीगणेशा होतो. यावर्षी प्रत्यक्ष एकत्रीकरण आणि शिबीर घेणे शक्य नव्हते. पण यात खंड पडू न देता शाखा विभागाने सर्व शाखांच्या व्यवस्था प्रमुखांची ऑनलाईन प्रशिक्षणे घेतली. यात सर्व शाखा उत्साहाने सहभागी झाल्या. सदर प्रशिक्षणात प्रत्येक शाखा व्यवस्था प्रमुखाला विषय वाटून दिले होते. त्या विषयाचा अभ्यास करून त्याची मांडणी प्रमुखांनी केली. प्रत्येक व्यवस्थेच्या प्रशिक्षणात त्या विषयातील तज्ञ आणि वर्धिनीतील अनुभवी कार्यकर्ते यांनी युवांना मार्गदर्शन केले. व्यवस्थेचे महत्त्व, प्रमुखाची भूमिका, आगामी काळातील नियोजनाचे टप्पे आणि एकूणच शाखा विकासासाठी सर्व व्यवस्थांचे एकत्रित प्रयत्न या विषयांवर चर्चा झाली. सर्व प्रशिक्षणाना उत्तम प्रतिसाद मिळाला.

**तासिका प्रमुखांनी मांडलेले काही विषय :**

- **स्वामी अखंडानंद शाखा :** आकाश शेडगे - एखादा तास न झाल्यास त्या वेळी मुलांच्या अभ्यासपूरक उपक्रमांची रचना करणे.
- **स्वामी दयानंद सरस्वती शाखा :** निमेश यादव - अभ्यास कौशल्य कार्यशाळा घेणे.
- **धर्मवीर शंभूराजे शाखा :** प्रणव कुपाटे - शाखेत वरच्या इयत्तेतील विद्यार्थी खालच्या इयत्तेला शिकवतील असा प्रयोग करणे.
- **स्वामी ब्रम्हानंद शाखा :** निखिल साबळे - शाखेच्या शैक्षणिक गुणवत्तेची माहिती गोळा करणे व त्याचा आलेख तयार करणे.
- **स्वामी सुबोधानंद शाखा :** अभिषेक कनोजिया - शाखेत इयत्ता शिक्षक व इयत्ता प्रमुख यांची तासिका टीम तयार करणे.

## तासिका व्यवस्था प्रशिक्षण

दि. ६ ऑगस्ट २०२० रोजी तासिका विभागाचे प्रशिक्षण पार पडले. यात तासिका व्यवस्था प्रमुखांना मार्गदर्शन करताना ताईनी अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांची मांडणी केली. स्व रूपवर्धिनीचे मनुष्य निर्मितीचे शिक्षण मुलांपर्यंत पोहोचवून त्यांचात नेतृत्व विकास घडवायचा आहे. त्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रमातून मुलांच्या बौद्धिक आणि शैक्षणिक विकासासाठी सतत प्रयत्न केले पाहिजेत असे ताईंनी सांगितले शिवाय पुण्यातील विद्यार्थी सहाय्यक समिती, ज्ञानप्रबोधिनी या संस्थांमध्ये होत असलेल्या स्वयंअध्ययन व स्वावलंबन याविषयीच्या उपक्रमांची माहिती ताईंनी दिली.

## मैदान विभाग

दिनांक ५ ऑगस्ट २०२० रोजी Online पद्धतीने केंद्रीय मैदानप्रमुख बैठक घेण्यात आली. या बैठकीत शाखांचे मैदानप्रमुख, त्यांचे सहाय्यक यांनी सहभाग घेतला. शाखा विभाग प्रमुख शुभम जगताप, डॉ. विनेश नगरे, मा. विश्वास कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सर्वांनी आपला परिचय करून दिला. बैठकीच्या आधी सर्व मैदान प्रमुखांना काही assignments दिल्या होत्या, त्यांची मांडणी केली.शाखेच्या मैदानाचा उद्देश आणि त्यातून वर्धिनीला यातून काय अपेक्षित आहे याबबत चर्चा झाली. विनेश सरांनी मैदानाचे महत्त्व व मैदानाचे नियोजन या संदर्भात मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाचा समारोप करताना विश्वास सरांनी सर्व मैदानप्रमुखांचे कौतुक केले व त्यांना पुढील कामांसाठी शुभेच्छा दिल्या.

## कार्यक्रम व्यवस्था प्रशिक्षण

कार्यक्रम व्यवस्था हि एक अशी रचना आहे ज्यातून वर्धिनीला अपेक्षित अनेक विषय मुलांपर्यंत पोहोचवता येतात. सदर प्रशिक्षणाच्या माध्यमातून कार्यक्रम व्यवस्थेचे महत्त्व आणि गरज सर्व कार्यक्रम प्रमुखांना समजावून सांगण्यात आली. यामध्ये श्री. संदीप मोरे, मंदार पोफळे, हर्षल सोनार, रोहित धायरकर यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणात खालील विषयांवर मांडणी केली.

१) कार्यक्रम उद्देश, नियोजन, निरोपाची व्यवस्था, वेळेचे नियोजन, अंमलबजावणी आणि त्यातून आपल्याला काय शिकायला मिळाले या सर्व बाजुंनी एखाद्या कार्यक्रमाचा विचार.

२) आपल्या शाखेचे पुढील ६ महिन्यांचे कार्यक्रम व्यवस्थेचे नियोजन.

## संपर्क व्यवस्था

संपर्क हा वर्धिनीच्या कामाचा आत्मा आहे हे सूत्र अनेक वर्ष आपण जपत आहोत. नव्या पिढीला संपर्क या विषयातले मर्म कळावे आणि आजही उत्तम संपर्काच्या जोरावर वर्धिनीशी अनेकजण कायमस्वरूपी जोडले जावेत हा विचार प्रशिक्षणाच्या माध्यमातून पोहोचवण्यात आला. सदर प्रशिक्षणात युवांना विविध प्रसंग सांगण्यात आले आणि तुम्ही त्या प्रसंगात कशा पद्धतीने संपर्क कराल याविषयी प्रात्यक्षिक देण्यास संगीतले. यात सर्वांनी उस्फुर्त सहभाग घेतला. प्रशिक्षणाचा समारोप श्री. निलेश धायरकर यांच्या मार्गदर्शनाने झाला.

## मासिक वर्धन कृती पुस्तिका उपक्रम

शाखा विभागातर्फे वर्धक वर्धिका यांच्या सर्वांगीण विकासासाठी, अनौपचारिक शिक्षणासाठी निश्चित केलेल्या ८ विषयांचे प्रशिक्षण घेऊन अभ्यासक्रम निश्चिती करून शाखांवर याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या अनौपचारिक शिक्षणामध्ये जीवन कौशल्ये, शारीरिक विकास, स्व-अभ्यास कौशल्ये व तंत्रे, शालेय अभ्यास विषयांचे संकल्पनात्मक शिक्षण, भाषा विकास, भाषा समृद्धी, प्रज्ञा विकास, प्रेरणा जागरण, स्वयंप्रेरणा जागरण, मूल्यवर्धन, आधुनिक तंत्रज्ञान शिक्षण अशा अनेक विषयांचा समावेश होतो. वर्धिनीमध्ये नेहमीच विविध कौशल्ये विकसित करण्यावर भर दिला जातो. आपण सगळे विद्यार्थी आहोत. या अनुषंगाने उपक्रमांच्या माध्यमातून विविध कौशल्ये नकळतपणे आत्मसात करण्याची संधी शिबिरे, सहली, व्याख्याने, मैदानावरील खेळ, परिपाठ यातून मिळत असते.

लॉकडाऊन काळात विधायक बंदी नावाने एक गट तयार केला. शाखेतील वर्धक वर्धिका यांच्या अनौपचारिक शिक्षणासाठी या गटात अनेक चर्चा झाल्या व ते उपक्रम शाखेवर घेण्यात आले. या गटाने गेले ३ महिने अविरत काम केले. हे काम आता एका महत्त्वपूर्ण टप्प्यात आले आहे, तो टप्पा म्हणजे मासिक वर्धन पुस्तिका उपक्रम. गेल्या काही महिन्यात असे जाणवले की बऱ्याच मुलांकडे फोनच्या माध्यमातून पोहोचणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांचा हाती प्रत्यक्ष कृती पुस्तिका मिळाली तर याचा मुलांना फायदा होईल. म्हणूनच या महिन्यात “मैत्री” या संकल्पनेवर आधारित कृती पुस्तिका योग्य ती खबरदारी घेऊन मुलांपर्यंत पोहोचविण्यात आली. जिथे सुखांची बेरीज होते, दुःख-संकटांची वजाबाकी होते अशा मैत्री या नात्याविषयी व्यक्त होण्याची संधी वर्धकाना उपलब्ध करून दिली.



**अजूनही कोरोनाचे निर्बंध उठलेले नाहीत. त्यामुळे 'वर्धिनी घराघरात' हा उपक्रम मोबाईलच्या सहाय्याने चालू आहे त्यातील विशेष...**

## स्वामी विवेकानंद शाखा

दैनंदिन प्रश्नमंजुषा - शाखेच्या गटावर दैनंदिन प्रश्नमंजुषा घेण्यात आली .दर आठवड्याला विजेत्या वर्धकांची नावे सांगितली.

अंदाज बांधणी व अक्षर गंमत- युवा कार्यकर्ता सुरेश दादा पवार याने वेगवेगळ्या खेळातून विषय मांडला.अंदाज बांधणी यासाठी घरातून कडेकडेने चालून पाऊलअंतर मोजणे, भांड्यात ओंजळीने किती पाणी भरेल व अक्षर गम्मत याविषयी तीन मिनिटात काना,मात्रा ,वेलांटी, उकार नसलेले जास्तीत जास्त शब्द लिहिणे हे खेळ घेतले.

■ गुरुपौर्णिमा - ५ जुलैला गुगल मीट द्वारे युवा विभाग प्रमुख चेतन कुसाळकर यांनी मार्गदर्शन केले. स्वामी विवेकानंद आणि समर्थ रामकृष्ण परमहंस या गुरू-शिष्याच्या नात्यातून गुरूंचे महत्त्व सांगितले. शालेय वयात गुरू कसा निवडावा, इंटरनेट हा आपला गुरु असू शकतो का, चांगल्या शिष्याचे कोणते गुण असतात, अशा प्रश्नोत्तरी संवादातून त्यांनी आपल्या जीवनातील गुरूंचे महत्त्व पटवून दिले.

■ चर्चासत्र - 'मी आणि माझा ऑनलाईन अभ्यास' या विषयावर अभिजीत दोडके दादाने ११ जुलैला गुगल मीट द्वारे चर्चा घेतली .या आधी मुलांना ऑनलाईन अभ्यासाचा अनुभव नव्हता. त्यामुळे ऑनलाइन अभ्यासात कंटाळा येणे, नियोजन नीट न होणे, शिकवलेला अभ्यास न समजणे, सभोवतालच्या वातावरणामुळे अभ्यास करताना अडचणी येणे अशा अनेक समस्या मुलांशी बोलताना लक्षात आल्या. या सर्व अडचणींवर उपाय शोधण्यासाठी दादाने चर्चा घेतली. सध्याच्या परिस्थितीत मोबाईलचा वापर करून नवीन पद्धतीने आपण अभ्यासाचा आनंद कसा घेऊ शकतो हे दादाने सांगितले. तसेच काही मुलांशी वैयक्तिक संपर्क साधून त्यांच्या समस्या सोडवण्यास दादाने मदत केली.

■ ऑनलाइन खेळ - १६ जुलै रोजी शाखेत रोज होणारे व्यायाम, सूर्यनमस्कार , योगासने झाली. कपाळावर बिस्किट ठेवून हात न लावता खायचे हा मजेदार खेळ झाला.

२६ जुलै रोजी हनुमान दादा ने काही खेळ घेतले. Toungue twister - काही वाक्य ठराविक वेळेत न चुकता जास्त वेळा म्हणणे , एका शब्दातून जास्तीत जास्त शब्द बनवणे , तोंडाने म्युझिक बिट तयार करणे असे मजेदार खेळ घेतले .तसेच कारगिल विजय दिनाची माहिती सांगितली

■ वृक्षारोपण - श्री ज्ञापु सरांना श्रद्धांजली म्हणून शाखेतील युवक कार्यकर्ते अमर ठाकूर, किरण सूर्यवंशी व प्रकाश चौधरी यांनी हनुमान टेकडीवर झाडे लावली.

## स्वामी दयानंद सरस्वती शाखा

■ वेशभूषा स्पर्धा - आषाढी एकादशीनिमित्त वारकरी वेशभूषा स्पर्धा झाली. त्याचबरोबर मुलांनी भजन, अभंग, भारुड, कीर्तन, वादन यांचे सादरीकरण केले.

■ गुरुपौर्णिमेनिमित्त निबंध स्पर्धा झाल्या.

■ कंपनी इन्फो स्पर्धा - या स्पर्धेत स्पर्धकांना १० कंपन्यांची नावे देऊन त्यांच्या c e o ची नावे शोधण्यास सांगितली. यातून मुलांना कंपनी व ceo दोघांची माहिती मिळाली.

■ क्रीडा प्रकल्प स्पर्धा - वर्धकांनी त्यांच्या आवडीच्या ५ खेळांची माहिती, खेळाची ओळख, इतिहास, मैदान , नियम व संबंधित खेळा बद्दल दिले जाणारे पुरस्कार इत्यादी मुद्द्यांना धरून माहिती लिहिली.

## समर्थ रामकृष्ण शाखा

■ चर्चासत्र - आंतरराष्ट्रीय स्तरावरील ऑस्कर या पुरस्काराची ऑस्कर म्हणजे काय, तो कशासाठी दिला जातो, आत्तापर्यंत कोणाला हा पुरस्कार मिळाला आहे , या संदर्भाने माहिती दिली. तसेच पुण्यातील पेठांना नावे कशी मिळाली, त्या कोणी स्थापन केल्या व कधी स्थापन झाल्या याची माहिती सांगितली . कबड्डी दिनानिमित्त खेळाची सविस्तर माहिती सांगुन स्वतःच्या आवडीच्या खेळाडूंचा फोटो आणि व्हिडिओ गटावर पाठवण्यास सांगितले.

■ लुडो किंग - सर्व मुलांसाठी ऑनलाइन लुडो किंग खेळाची स्पर्धा झाली त्यात ४० वर्धकांनी भाग घेतला.

# साप्ताहिक ऑनलाईन शाखा

## स्वामी दयानंद सरस्वती शाखा

जुलै महिन्यात तीन वेळा शाखा झाली. शुभम नरके, सुरेश पवार, मंदार पोफळे या युवक कार्यकर्त्यांचे कथाकथन झाले . त्याच बरोबर व्यायाम परिपाठ व छोट्या स्पर्धा ही झाल्या.

## क्रांतिज्योती सावित्री शाखा

१६ ऑगस्ट - ऑनलाईन शाखेत स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने कार्यक्रम आयोजित केला होता.

■ छाया ताई सकटे ह्यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची गोष्ट सांगितली. ताई साता-याला रहात असल्याने त्यांना शाखेवर येता येत नाही. ऑनलाईन शाखेमुळे त्यांना १३ वर्षांनी शाखेत यायची संधी मिळाली. त्यांना खूप आनंद झाला.

## स्वामी ब्रह्मानंद शाखा

जुलै महिन्यात दर रविवारी संध्याकाळी ६:३० ते ७:३० या वेळेत ऑनलाईन शाखा घेण्यात आली. यात व्यायाम, सूर्यनमस्कार आणि कार्यक्रम किंवा उपक्रम असा क्रम होता.

५ जुलै - ओम दादाने विविध गोष्टींची नावे लिहायला सांगितली. उदा. किल्ला, राज्य, देश,खेळाडू.

१२ जुलै - निखिल साबळे दादाने मुलांना कागदांपासून पेनस्टॅन्ड कसे बनवायचे हे प्रत्यक्ष कृती करून दाखवले व त्याच्या सूचनेनुसार मुलांनी उत्तम उत्तम पेनस्टॅन्ड बनवले.

१९ जुलै - मुलांना काडीपेटीच्या काड्यांपासून विविध गोष्टी बनवण्यास सांगितल्या. जसे स्वतःचे नाव, शाखेचे नाव, इ. आणि या साठी ठराविक वेळ देण्यात आली. यातून मुलांची creativity समजली. मुलांना मेणबत्ती चा प्रयोग दाखवण्यात आला.ज्यामध्ये जर मेणबत्ती ची ज्योत विझली आणि त्या धुराला जर आपण काडी लावली तर त्या धुराच्या मदतीने ती पुन्हा पेट घेते. ह्याविषयी त्यामागचा वैज्ञानिक दृष्टीकोन काय आहे, त्याचे कारण काय? हे शोधण्यास सांगितले.

९ ऑगस्ट - क्रांती दिनानिमीत्त वैभव दादाने क्रांती दिन का साजरा केला जातो ? त्याचा इतिहास. अशी माहिती सांगितली. इयत्ता ७ वी आणि ९ वी तील मुलांनी क्रांतिकारकांच्या गोष्टी सांगितल्या.

ओम दादाने अक्षरांची गंमत ही स्पर्धा घेतली. यामध्ये
१. काना, मात्रा, वेलांटी, उकार नसलेले शब्द
२. फक्त काना असलेले शब्द
३. एका शब्दाच्या शेवटच्या अक्षरापासून पुढचा शब्द
यात वर्धकांचा सहभाग उत्तम होता.

## भगिनी निवेदिता शाखा

५ जुलै - भाग प्रमुख ,कोमल ताई धायरकर यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले. समृद्धी ताईने हेलन केलर आणि त्यांच्या गुरू ,छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या प्रथम गुरू जिजामाता, स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण परमहंस अशा गुरु-शिष्यांच्या विषयी माहिती सांगितली. कोमल ताईंनी मुलींना वर्धिनीतील गुरुशिष्यांची जोडी कोणती ? असा प्रश्न विचारला मुलींनी समर्पक उत्तरे दिली. आपली आई आपली पहिला गुरु आहे आणि म्हणून आईसोबत एक फोटो काढून तो व्हाट्सअप ग्रुप वर टाकायचा हा विचार मुलींकडून आला. दिवसभर मुलींनी आपापल्या शाळेतील शिक्षकांना मेसेज केले आणि त्याचे स्क्रीनशॉट ग्रुप वर टाकले .

१२ जुलै - श्री.निलेश सरांनी वर्धिनीतून आणि शाखेतून घडलेल्या काही युवतींची उदाहरणे दिली. शाखेत सध्या काम करत असणाऱ्या युवतींबद्दल माहिती सांगितली. दैनंदिन अडचणींवर मात करून शाखा घेण्याची प्रेरणा युवतींना मिळते आणि म्हणून त्या उत्तम पद्धतीने शाखेचे काम सुरू करण्यात यशस्वी ठरतात. वर्धिनीच्या शाखा का महत्त्वाच्या आहेत हे ही सरांनी सांगितले.

१९ जुलै - गप्पागोष्टी, खेळ - या शाखेमध्ये समृद्धी ताईनी मुलींना मायकल डेल ची प्रेरणादायी गोष्ट सांगितली. वेगवेगळ्या लोकांचे मार्गदर्शन आपण सतत घेतले पाहिजे त्यांना भेटले पाहिजे. आपणच आपल्या प्रगतीला कारणीभूत असतो म्हणून आपण चांगल्या गोष्टींमध्ये वेळ घालवला पाहिजे असे सांगितले. या सत्राच्या सुरुवातीला मुलींनी स्क्रीन समोर घरातील एक अशी गोष्ट दाखवायची होती की त्यातून संघटन ह्या शब्दाचा अर्थ कळेल किंवा त्या वस्तूमुळे घरचे सगळे एकत्र येतात. काही मुलींनी ताट दाखवलं म्हणजे जेवताना एकत्र येतात. काही मुलींनी आरतीचे तबक दाखवले आरतीला घरचे सगळे एकत्र येतात. यातून संघटन ह्या शब्दाचा अर्थ कृतीतून सांगितला.

२३ जुलै - ज्ञापूंच्या आठवणी - आजच्या शाखेमध्ये संपूर्ण भाग पाच सहभागी होता . यात सर्व जुन्या युवती, वर्धिका, व शाखेत येणाऱ्या मुली सहभागी झाल्या. सगळ्यांच्याच मनात ज्ञापु च्या आठवणी होत्या आणि सर्वांनी त्या आठवणी सांगितल्या

२६ जुलै - कारगिल विजयदिवस - कारगिल विजय दिवसाची माहिती गायत्री मोरेने मुलींना दिली आणि डॉ. संजय तांबट यांनी ज्ञानेश पुरंदरे सरांबद्दल लिहिलेला लेख मुलींना वाचून दाखवला. यातून श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांची कामाबद्दलची तळमळ, त्यांचे वर्धिनी बद्दलचे प्रेम, ज्ञापुंचे लहानपण, मुलींच्या लक्षात आले.

## कोरिगडचा बिमल

आज सकाळी मोबाइलची रिंग वाजली, अनोळखी नंबर होता. मी कॉल उचलला आणि तिथे कसली तरी चुळबुळ चालली होती ती मी ऐकली. (ए मला देना, नाही पहिला मी, मीच बोलणार, देना अरे)
"नमस्कार कोण बोलताय आपण ?", मी बोललो.

"हॅलो सिद्धार्थ दादा, मी बिमल, आंबवणे गावचा. तुम्ही सगळे आला होतात, आमच्याकडे सहलीला. आठवलं का" ? आणि माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला बिमल, हलके निळसर डोळे, केस कितीही विस्कटले तरी परत आहे तसाच सुरेख आकार घेणारे,शांत आणि लाजाळू स्वभाव,भाषा अशी की पुणेकरांना सुद्धा लाजवेल. बिमलचं कुटुंब हे बिहारचे, संपूर्ण परिवार इथे येऊन ४० वर्षे झाली असतील, आता ते इथलेच रहिवासी झाले आहेत.

"तू तुमच्या संस्थेचं पुस्तक (कार्यवृत्त) मला दिलं होतंस, ते पुस्तक मी शाळेत बाईंना वाचायला दिलं होतं, त्यात तुझा नंबर तू लिहून दिला होतास. परवाच बाई शाळेच्या कामासाठी आल्या होत्या. मी लगेच पळत जाऊन त्यांना ते पुस्तक मागितलं. त्यांनी ते त्यांच्या लॉकर मधून काढून दिलं. माझे मामा मामी पण गावावरून आम्हाला भेटायला आले आहेत. आमच्याकडे मोबाइल नाही म्हणून मामाच्या मोबाइल ने तुला फोन लावला. दादा विसरलास ना तू" ?

मनातलं सगळं अगदी धडाधड सांगत होता, मला बोलण्याची संधीच मिळत नव्हती.
म्हणालो, "अरे तू थांबशील तेव्हा मी बोलेल ना !"
हसला... (आजूबाजूची मुलंही हसली)

"दादा, आई पण तुझी आठवण काढत होती. सर्व्हेसाठी तू माझ्या घरी आला होतास, वरण भाकर खाल्ली होतीस, आठवतंय ना.?"

"हो रे सगळं आठवतंय", मी म्हणालो.

"मम्मी आजीला सांगत होती, माझं बाळ

माझ्या घरी जेऊन गेलं होतं गं... आता परत कधी येणार देवालाच ठाऊक". हसत हसत सांगत होता.

बाजूला बसलेल्या मुलांचा आवाज आला, "अरे दादाला विचार की कसा आहेस, काय चाललंय ?, तुझंच सांगतोय... अरे हा. कसा आहेस दादा तू ?"

"मी एकदम मजेत. शाखाही अगदी मजेत. मधे कोरोनाची लागण झाल्यामुळे १० दिवस क्वॉरंटाईन झालो होतो. आता सगळं ठीक आहे. घरीही सगळे ठीक आहेत."

"काळजी घे रे दादा, बाहेर नको जाऊस. दादा तुला माहिती का आम्ही पण तुमच्या सारखाच इथं गट तयार केला आहे. तुम्ही जिथे खेळत होता, तिथेच आम्ही तुम्ही शिकवलेले खेळ खेळतो. मूर्तीगट्टा, तळ्यात-मळ्यात, घोडा-घोडी, दहा कँच, लगोरी असे. तुमची खूप आठवण येते तेव्हा. आणि दादा आम्ही रोज संध्याकाळी एकत्र अभ्यास करतो. गाणी बोलतो, खेळ खेळतो. खूप मज्जा करतो आम्ही."

(लांबून हाक मारलेला आवाज ऐकू येतो)

"चल मी जातो दादा,आजी बोलावतीये, खेकडे पकडायला जायचं आहे. अरं दादा तुला तलाव बघायचा होता ना, तू आला होता तेव्हा पाणी पण कमी होतं आणि वेळ पण नव्हता म्हणून तू आला नाही. आता तो तलाव मस्त भरला आहे तिकडेच चाललोय. आपण नंतर बोलू नक्की परत. काळजी घ्या दादा, आणि शाखेचे फोटो नक्की पाठव."

***- सिद्धार्थ देवकर***
*(विवेकानंद शाखा)*

# युवा विभाग

**(Leaders talk) संवाद नेतृत्वाचा भावी नेतृत्वाशी**

'विकसित व्हावे । अर्पित होऊनि जावे ।' या 'स्व'-रूपवर्धिनीच्या ब्रीदवाक्याला साजेसा असा नेतृत्व निर्माणाचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे करीयर.

U-Lead अंतर्गत युवक युवतींच्या उज्वल भवितव्यासाठी युवा विभाग सातत्याने अनेक उपक्रम घेत आहे. करिअर हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा आणि तितकाच महत्त्वाचा विषय. निवडलेल्या क्षेत्रात सर्वोत्तम प्राविण्य मिळवून त्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करावा हे सांगणारी अनेक व्यक्तिमत्वं वर्धिनीच्या मुशीतून तयार झाली . या व्यक्तींचा प्रवास आजच्या युवांसमोर मांडून त्यातून त्यांनी प्रेरणा घ्यावी यासाठी या सत्राचे आयोजन करण्यात आले. 'एक भाग एक व्यक्ती' अशी रचना लावण्यात आली. 'आम्ही बी घडलो, तुम्ही बी घडाना' अशा आशयाच्या या चर्चासत्रात आपल्या प्रत्येक भागातून युवक युवतींनी उत्साहाने सहभाग घेतला.

**वक्ते :-**

- भाग १ - डॉ. संजय तांबट
- भाग २ - श्री. विश्वास कुलकर्णी
- भाग ३ - श्री. विलास कुलकर्णी
- भाग ४ - श्री. अरविंद केळकर
- भाग ५ - मा. बागेश्रीताई पोंक्षे

**विषय बिंदू :-**

- शाखेच्या युवक युवती यांचे करिअर उत्तम का असावे?
- आपले शिक्षण सर्वोत्तम शिक्षण संस्थांमधून का व्हायला हवे?
- आपल्या व्यावसायिक कौशल्यात उच्च दर्जाचे प्राविण्य का असावे?
- शाखेचे काम करणाऱ्या युवांचे शिक्षण व करिअर उत्तमच असावे असा आग्रह वर्धिनी का धरते?
- असे उत्तम शिक्षण, करिअर करणाऱ्या युवांनी समाजाचे नेतृत्व का केले पाहिजे?

## भाग 3 - श्री. विलास कुलकर्णी सर

सत्राची सुरुवात विलास सरांनी न्यायशास्त्री नारायण प्रभुणे यांच्या उदाहरणावरून माणसाने ध्येय उच्च ठेवले तर तो ते कसे मिळवू शकतो याने केली.

कै. किशाभाऊंचे उदाहरण देत करिअर व शिक्षणाचा ताळमेळ कसा बसवला तसेच समाजाच्या विकासासाठी 'स्व'-रुपवर्धिनीची स्थापना याबद्दल युवकांना मार्गदर्शन केले. पराग लकडे सरांनी वर्धिनीला दिलेली २ वर्षे व आपल्या शिक्षणातुन समाजातील त्रुटी दुर करण्याचे ठेवलेले ध्येय व पर्यावरणातील कचर-याची विल्हेवाट लावण्यावरील संशोधन व आर्किटेक्ट असोसिएशन च्या सेक्रेटरी पदापर्यंत केलेला प्रवास सरांनी युवकांसमोर मांडला. स्वतःच्या करिअर व शिक्षणातील प्रवास सांगताना सरांनी ठरवलेली विविध ध्येयं जसे की रक्तदान शिबिरांचे आयोजन, सर्वसामान्य लोकांचे आयुष्य सुधारण्यासाठी केलेले प्रयत्न यातुन त्यांना मिळालेल्या करिअरच्या संधी बद्दलची माहिती दिली. Thermax कंपनीतून पाणी व्यवस्थापनासाठी मिळालेल्या संधीबद्दल बोलताना केनियातील किसिमो शहरातील व्हिक्टोरिया लेकच्या प्रदुषित पाण्याची गुणवत्ता कशी वाढवली व प्रदुषित पाण्यामुळे होणा-या रोगांना कसा आळा घातला याबद्दल सांगितले. आयुष्यात धोका पत्करल्याशिवाय प्रगती होत नाही याचे उत्तम उदाहरण दिले. तसेच संघाच्या प्रचारकांच्या मार्गदर्शनातून भारत व महाराष्ट्रातील पाणी प्रश्नांवर काम करण्याचा निर्णय घेऊन उजनी धरण, धुळे, जळगाव अश्या शहरात केलेल्या कामाबद्दल माहिती दिली. करिअर करत असताना अफाट वाचन, वेगवेगळी कौशल्य विकसित करणे, लोकांना आवडणा-या गोष्टींमधुन आपले ध्येय पटवून देणे, आयुष्यात दोन पाऊल पुढे जाण्यासाठी value addition (मूल्य जोपासना) करणे, शिकण्याची आवड असेल व त्या गोष्टीबद्दल जगातील व भारतातील ज्ञान मिळवता आले तर तुम्ही कोणतेही करिअर निवडू शकता. आयुष्यात Business career & Social career यांचा ताळमेळ असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर युवक हा शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असला पाहिजे. The monk who sold his Ferari या पुस्तकाबद्दल सांगताना अडचणींना आयुष्यातील संधी समजून त्यावर मात करा असे सांगुन सरांनी सत्राचा शेवट केला.

## भाग 2 - श्री विश्वास कुलकर्णी सर

श्री गणेशाला वंदन करून 'Leaders Talk' कार्यक्रमाचा उद्देश आणि महत्त्व स्पष्ट करून चेतन ठाकरे दादाने श्री. विश्वास कुलकर्णी सरांचा परिचय करून दिला आणि सत्राची सुरूवात झाली.

आपल्या भागातील पहिली शाखा स्वामी अखंडानंद शाखेची सुरूवात आणि त्यानंतर झालेला भागाचा विस्तार, त्यावळेचे युवक, त्यांचे काही अनुभव आणि सद्यस्थितीतील भागातील शाखांची एकंदर परिस्थिती अशा अनेक मुद्द्यांना स्पर्श करत जुन्या आणि नव्याची सांगड घालून वर्धिनीला अपेक्षित वर्धिनीचा युवक कसा असला पाहिजे, त्याचे करियर कसे असले पाहिजे ? हे सरांनी विविध उदाहरणे आणि सादरीकरणाच्या (Presentation) च्या माध्यमातून पटवून दिले.

- आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे ३ टप्पे

१. 'स्व'- रुपाचे वर्धन

२. व्यक्तिमत्वाची ओळख

३. नेतृत्वाची घडण

- जन्मजात कोणीही नेता म्हणून जन्माला येत नाही, आपल्याकडचे उपजत असलेली कौशल्य ओळखून, सतत नवीन काहीतरी शिकत राहून अनेक नवनवीन कौशल्यं आपल्या युवकांनी आत्मसात केली पाहिजेत.
- प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात हिमालयाची उंची गाठली पाहिजे. उदा, सचिन तेंडूलकर, लता मंगेशकर यांनी त्यांच्या क्षेत्रात हिमालयासारखे प्रचंड उंचीचे काम केले आहे. याचप्रमाणे वर्धिनीच्या प्रत्येक युवकाने उच्च ध्येय ठेवून काम करावे, मी जे करेल ते सर्व अव्वल दर्जाचे राहील यासाठी आग्रही असावे.
- उच्च ध्येय म्हणजे नक्की काय..?? हे पटवून देण्यासाठी सरांनी Eight Thousander's (Mountains above 8000 metres) ही संकल्पना सांगितली.

आपल्या दैनंदिन जीवनात टेकडीवर किंवा डोंगरावर जाणारे अनेक जण असतात पण एव्हरेस्टवर जाणारे मात्र खूप कमी लोक असतात. त्याचप्रमाणे आपल्या युवकांनी सायन्स, कॉमर्स, आणि आर्टस अशा ठराविक शाखा न निवडता आपल्या आवडीच्या क्षेत्रातील वेगळ्या वाटा शोधून त्यात करियर केलं पाहिजे.

- करियरच्या दृष्टीने काही नामांकित शैक्षणिक संस्था आणि त्यांच्या अभ्यासक्रमाविषयी सुध्दा थोडक्यात पण खूप महत्त्वपूर्ण माहिती सरांनी यावेळी दिली.
- TIFR (TATA Institute Of Fundamental Research)
- IISC (Indian Institute of Science)
- PGIMER, Chandigarh (Post Graduate Institute of Medical Educationand Research,Chandigarh)
- TISS (TATA Institute of Social Sciences)
- नामांकित शिक्षण संस्थेत शिक्षण घेण्याचे फायदे आणि विविध संधी याविषयीही सरांनी माहिती दिली.
- ध्येयाचे दर्शन झाले म्हणजे आपण अर्पित होवून काम करू शकतो.
- आपणच आपल्या स्वतःचे सर्वांत चांगले मित्र किंवा शत्रू असतो.
- वर्धिनीच्या युवकांच्या जगण्याचं माध्यमच प्रतिकुलता आहे. प्रतिकुल परिस्थितीला सुध्दा आपल्या युवकांनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर अनुकूल बनवून उत्कृष्ट करियर करून समाजासमोर आदर्श निर्माण केला पाहिजे.
- वर्धिनीचं काम म्हणजे प्रयोगिक शिक्षणच (Exprimental Learning)
- आपल्या नेतृत्वाची घडण ही आपल्या रोजच्या शाखेतूनच होत असते.
- घडावी विवेकी कृती ध्यास हा - हीच आपल्या नेतृत्वाची प्रेरणा असली पाहिजे.
- कार्यक्रमाच्या उत्तरार्धात युवकांनी जरूर वाचावीत अशी काही पुस्तके सरांनी सुचवली.

1) Future Shock, 2) Who Moved My Cheese - DR. Spencer Johnson, 3) Jonathan Livingston Seagall -Richard Bach

- एकाचवेळी अनेक आघाड्यांवर आपले युवक लढत असतात (शाखेची/वर्धिनीची जबाबदारी,घरची जबाबदारी, महाविद्यालयीन शिक्षण, नोकरी) या सगळ्यासोबत तितक्याच ताकदीने लढण्यासाठी आपल्या युवकांनी वेळेचे नियोजन, कामाचा प्राधान्यक्रम ठरवून प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत.

अशा पध्दतीने करियरच्या वेगळ्या वाटा आणि कौशल्यविकास अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर कार्यक्रमात सकारात्मक चर्चा झाली. संकल्प प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप झाला.

## असे वक्ते असे विषय

| वक्ते | विषय |
|---|---|
| श्री. महेश पवळे | युवा विभाग नियुक्ती कार्यक्रम मार्गदर्शन |
| श्री. अभितेज बोडा | U – Lead उद्घाटन सत्र |
| श्री. सुमित शेवडे | ई-मेल कसा लिहावा |
| श्री. राहुल लाळे | कोरोना आणि नवीन जीवनशैली |
| श्री. निलेश धायरकर | करियरच्या वेगळ्या वाटा |
| श्री. संतोष परंडवाल | सादरीकरण कौशल्य |

# आमचे युवा - आमची ताकद



लहानपणापासून विवेकानंद शाखेत येणारा हनुमान आज वर्धिनीच्या वस्ती विकास प्रकल्पात ‘ प्रकल्प समन्वयक’ म्हणून काम करत आहे. काही दिवसांपूर्वी स्वतः हनुमान, त्याची आई, आजी, वडिल अस सगळं कुटुंबच कोरोना पॉझिटिव्ह झालं. अशा कठीण परिस्थितीत स्वत:ची काळजी घेत घरच्यांची देखभाल करत आमचा हनुमान लढत होता.

अशातच एका कोरोना पॉझिटिव्ह व्यक्तीला प्लाझ्मा ची आवश्यकता आहे हे त्याच्या कानावर आलं. आज अशा तरुणांनी प्लाझ्मा डोनेट करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे अनेक कोरोना बाधित रुग्ण बरे होण्यास मदत होईल. कोरोना मुक्त झालेली व्यक्ती डिस्चार्ज व होम क्वारंटाईन नंतरच्या २८ दिवसांनी प्लाझ्मा डोनेट करू शकते. हा निरोप हनुमानने वाचला आणि लगेचच प्लाझ्मा डोनेट करण्याची तयारी दाखवली. आपल्या बांधवांच्या मदतीला धाऊन जायचे ही वर्धिनीची शिकवण त्याने आपल्या प्रत्यक्ष वागणुकीतून दाखवून दिली. खरं तर ही गोष्ट थोडी अवघड होती. परंतु काही दिवसांपूर्वी या आजाराचा अनुभव घेतला असल्याने त्यातून बरे होण्याचे महत्त्व त्याने ओळखले आणि मदतीसाठी धावून गेला.

असे युवा कार्यकर्ते हे नेहमीचं संस्थेच्या कौतुकाचा आणि अभिमानाचा विषय ठरतात.

# विज्ञान - तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा

**विज्ञान व्याख्यानमाला**

अंन्टार्क्टिका एक आव्हान (भाग १) दिनांक : ८ ऑगस्ट २०२०

अंन्टार्क्टिका एक आव्हान (भाग २) दिनांक : १८ ऑगस्ट २०२०

मार्गदर्शक : मा. श्री. सुहास काणे सर (निवृत्त असिस्टट डायरेक्टर, DRDO, पुणे)

'स्व' - रूपवर्धिनी फिरत्या प्रयोगशाळेतर्फे याचे आयोजन करण्यात आले. जगातील सर्वात दूर, अतिशय थंड, कोरडे आणि रहस्यमय खंड म्हणून या खंडाची ओळख आहे. अशा या दुर्गम, तुफान वादळी, दाट काळोख, आणि अतिशीत वातावरणात १४ महिने राहून देशासाठी केलेल्या वैज्ञानिक संशोधनाच्या अनुभवाची सफर सर्वांसाठी आयोजित करण्यात आली.




# उत्थान प्रकल्प

१५ ऑगस्ट - निबंध,वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धा संपन्न झाल्या.

या महिन्यातील विशेष म्हणजे आठवड्यातून एकदा ऑनलाइन अभ्यासिका घेण्यास सुरुवात केली. तिन्ही भागातील कार्यकर्ते अतिशय उत्तम पद्धतीने अभ्यासिका घेत आहेत .

९ ऑगस्ट - निलेश धायरकर सरांनी ऑनलाइन अभ्यासिका उपक्रमाचे उद्घाटन केले. त्यांनी केलेल्या कथाकथनाला मुलांनी उत्तम प्रतिसाद दिला.

१६ ऑगस्ट – साप्ताहिक ऑनलाईन अभ्यासिकेत कार्यकर्त्यांनी मुलांना गणपती बाप्पाच्या कथा सांगितल्या.

३० ऑगस्ट - कसबा भागात विशेष उपक्रम झाला. यामध्ये अभ्यासिका प्रमुख पूर्वा भिडे, आणि त्यांची बहीण यांनी गिटार आणि Casio वादन केले. मुलांनी वादनाचा आनंद घेतला.

# समुपदेशन विभाग

**१० - १२ वी उपक्रम - या गटावर खालील विषयांवर सत्र घेण्यात आली .**

- अभ्यासाचे नियोजन
- वेळेचे महत्त्व
- लेखन कौशल्य
- वाचनाचे महत्त्व

या विषयांवरील कृती उपक्रमांना स्पर्धकांनी चांगला प्रतिसाद दिला.


- स्वामी दयानंद शाखेच्या ९ ऑगस्ट ला झालेल्या ऑनलाइन शाखेत सौ. मेघा नगरे यांनी स्पर्धकांशी संवाद साधला. श्यामची आई या पुस्तकातली गोष्ट मुलांना सांगितली .
- अनुभव कथन - लॉक डाऊन काळात दहावीतील मुलांशी नियोजनपूर्वक फोनवरून संपर्क साधला. शाखेच्या एका वर्धकाशी बोलताना जाणवले की त्याला विज्ञान विषय खूप अवघड वाटतो. शाळेत झालेल्या तासातही समजत नाही. त्याची ही अडचण तासिका प्रमुखांशी बोलून सोडवली. यासाठी त्याला शाखेच्या शास्त्र विषयाच्या शिक्षकांनी वैयक्तिक मार्गदर्शन केले आणि त्याचा गेलेला आत्मविश्वास वाढवायला मदत केली.

# पाकोळी बालवाडी (पुणे, भेकराईनगर)

कोरोनाच्या बंधनामुळे जून महिन्यात सुरू होणारी बालवाडी नवीन तंत्रज्ञानाच्या (व्हाट्सअपच्या) साहाय्याने सुरू झाली आहे. पालकांशी फोनवरूनचा संपर्क सतत चालू राहिल्याने हे शक्य झाले .

- दररोज विषयानुसार शिक्षिका व्हिडिओ करून पाठवतात व त्याप्रमाणे मुले घरी कृती करून त्याचा फोटो किंवा व्हिडिओ गटावर पाठवतात.
- आषाढ महिन्यातील दीप अमावस्येला अक्षता ताईंनी दिव्याची पूजा करून मुलांना गोष्ट सांगितली. याप्रमाणे मुलांनी पण घरी दिव्याचे पूजन केले आणि शुभंकरोती म्हटली.
- नागपंचमीला मोनाली ताईंनी पाटावर मातीचे छोटे वारूळ व नाग बनवले. त्याची पूजा करून नागोबाची गाणी व गोष्टी मुलांना सांगितल्या.
- श्रावणी शुक्रवार ची गोष्ट अनघा ताईंनी सांगितली.
- १५ ऑगस्टला घरा-घरात झेंडावंदन झाले. ऑनलाइन बालवाडीला चांगला प्रतिसाद मिळत आहे.





# महिला विभाग

यावर्षी रुग्ण सहाय्यक वर्गाची (पुणे व माले) अंतिम परीक्षा व्हाट्सअप च्या मदतीने घेण्यात आली. विद्यार्थिनींनी घरी पेपर लिहून ते शिक्षकांना फोनवर पाठवले. प्रॅक्टिकल ची परीक्षा व्हिडिओ कॉल वरून झाली. नियोजित तारखेला या सर्व उत्तरपत्रिका Online पद्धतीने एकत्र केल्या आणि आता निकालाचे काम चालू आहे. नवीन वर्षातील प्रवेशाला ही सुरुवात झाली आहे.

# भावपूर्ण श्रद्धांजली

- माजी राष्ट्रपती, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, भारतरत्न सन्मानित श्री. प्रणव मुखर्जी यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले.
- रामकृष्ण शाखेचे युवक व वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्रीकांत यादव यांच्या वडिलांचे श्री. मोहन यादव यांचे दु:खद निधन झाले.

**ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.**

**वर्धिनीचा परिवार त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे**

**।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।**